महापारेषण

महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN No. U40109MH2005SGC153646)
कार्यकारी अभियंता (यांचे कार्यालय)
अऊदा.संवसु.विभाग.पिंपरी-चिंचवड
२२० केव्ही उपकेंद्र चिंचवडजवळ,
बिजलीनगर, चिंचवड, पुणे - ४११ ०३३.

संदर्भ क्रं.काअ/अउदा.संवसु/पिंपरी-चिंचवड/मासं/ No - 0659 दिनांक :- - 7 AUG 2023

## शिकाऊ उमेदवारी कायदा, १९६१ अंतर्गत वर्ष २०२३-२०२४ करिता निवड झालेल्या उमेदवारांची तात्पुरती निवड यादी क्रमांक २

१. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतून वीजतंत्री या व्यवसायातून राष्ट्रीय व्यवसाय प्रशिक्षण परिषद (NCVT) उत्तीर्ण उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात आले होते. अर्ज सादर करण्याची अंतिम दि. १८.०६.२०२३ होती, याबाबत या कार्यालयात एकूण ७०० अर्ज प्राप्त झाले आहेत. यातून प्रथम निवडयादी व प्रतिक्षायादी दिनांक १७/०७/२०२३ रोजी प्रकाशित करण्यात आली, परंतू **आर्थिक द्रुष्टया दुर्बल घटकातील (EWS) हया संवर्गाचा पर्याय वेब साईटवर उपलब्ध नसल्याने त्या संवर्गातून निवड करणे शक्य झाले नाही. तरी यापुर्वी म्हणजे दिनांक १८.०६.२०२३ पर्यंत अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांस कळविण्यात येते की, आपणाकडे जर अलिकडच्या काळातील आर्थिक द्रुष्टया दुर्बल घटकातील (EWS) चे प्रमाणपत्र असल्यास सदर प्रमाणपत्र, दिनांक १७.०८.२०२३ पुर्वी या कार्यालयास hchr61b0@mahatransco.in या ईमेल व्दारे सादर करण्यात यावे.**

२. उमेदवारांची तात्पुरती निवड यादी क्र. २ तयार करण्यात आली असून, उमेदवारांची निवड यादी त्यांना S.S.C. व ITI (Electrician) मध्ये प्राप्त झालेल्या एकत्रित गुणांच्या सरासरीच्या आधारावर तसेच त्यांनी त्यांच्या अर्जामध्ये दर्शविलेल्या जात व इतर माहितीच्या आधारे तयार करण्यात आलेली आहे.

३. ज्या दोन किंवा अधिक उमेदवारांचे एकूण गुण समान आहेत अश्या उमेदवारांची जन्मतारिख विचारात घेवून त्यांच्यातील जेष्ठ उमेदवाराची निवड करण्यात आलेली आहे.

४. तात्पुरती निवड झालेल्या सर्व उमेदवारांना त्यांची शैक्षणिक अर्हता, वय, जात, आर्थिक दृष्टया दूर्बल घटक बाबतचे सर्व मूळ प्रमाणपत्रे /कागदपत्रे ही पडताळणीच्या वेळी सादर करणे बंधनकारक राहील व सादर करू न शकलेल्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल.

५. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश आहे म्हणून शिकाऊ उमेदवारीसाठी उमेदवाराचा कोणताही हक्क राहणार नाही. ही निवड यादी तात्पुरती असून पूर्णत: उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, जात प्रवर्ग व इतर अटी व शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून आहे. त्यामुळे शिकाऊ उमेदवार म्हणून निवड होणेसाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारणा करीत नसल्यास किंवा आवश्यक अटी व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधित उमेदवाराची उमेदवारी / निवड कोणत्याही टप्यावर रद्द करण्यात येईल.

६. तात्पुरत्या निवड यादीत नावाचा समावेश असलेला उमेदवार कागदपत्र पडताळणीत अपात्र आढळून आल्यास अथवा कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असून देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास प्रतीक्षा यादी कार्यान्वीत करण्यात येवून त्या यादीतील उमेदवारांची पात्रता व कागदपत्रे पडताळणी करण्याची प्रक्रिया पार पाडण्यात येईल. सादर प्रतीक्षा यादीतील उमेदवार सुध्दा कागदपत्र पडताळणी अपात्र झाल्यास कागदपत्र पडताळणीसाठी गैरहजर राहिल्यास अथवा कागदपत्र पडताळणीमध्ये पात्र असून देखील व्यवसाय प्रशिक्षणासाठी हजर न झाल्यास त्या खालील गुणवत्ताधारक उमेदवाराची स्वतंत्र निवड / प्रतीक्षा यादी लावण्याचे अधिकार अ.उ.दा.संवसु.मंडल, पुणे राखून ठेवत आहे.

७. तात्पुरत्या निवड यादी / प्रतीक्षा यादी तयार करतांना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आली आहे. तथापि, अनावधानाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारित करून योग्य ती कार्यवाही करण्याचे अधिकार अ.उ.दा.संवसु, विभाग, पिंपरी-चिंचवड राखून ठेवत आहे.

८. निवड न झालेल्या व प्रतीक्षा यादीतील उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार अ.उ.दा.संवसु, विभाग, पिंपरी-चिंचवड कार्यालयाकडे करू नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्रव्यवहाराची या कार्यालयाकडून दखल घेतली जाणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

**SELECTION LIST**

| Sr. No. | Name Of The Candidate | Category | Remark | Online Application No |
|---|---|---|---|---|
| | **Open** | | | |
| 1 | Munde Gopal Dilip | OPEN | SELECTION | AP0623131477 |
| 2 | Chille Krushna Shivanand | OPEN | SELECTION | AP062358065 |
| 3 | Dnyaneshwar Dattarao Karhale | OPEN | SELECTION | AP062356526 |
| 1 | Mahadevi Gangadhar Mandewad | OPEN | WAITING | AP062342678 |
| | **SC** | | | |
| 1 | Shivam Anandrao Ghodke | SC | SELECTION | AP062337523 |
| 1 | Vishal Manohar Mujmule | SC | WAITING | AP062368212 |
| | **NT-B** | | | |
| 1 | Shivam Vilas Pakhare | NT-B | SELECTION | AP062365420 |
| 1 | Aanamwad Sumeet Santosh | NT-B | WAITING | AP0623169173 |
| | **EWS** | | | |

**आर्थिक दुष्टया दुर्बल घटकातील (EWS) ह्या संवर्गाचा पर्याय वेब साईटवर उपलब्ध नसल्याने त्या संवर्गातून निवड करणे शक्य झाले नाही. तरी यापुर्वी म्हणजे दिनांक १८.०६.२०२३ पर्यंत अर्ज केलेल्या सर्व उमेदवारांस कळविण्यात येते की, आपणाकडे जर अलिकडच्या काळातील आर्थिक दुष्टया दुर्बल घटकातील (EWS) चे प्रमाणपत्र असल्यास सदर प्रमाणपत्र, दिनांक १७.०८.२०२३ पुर्वी या कार्यालयास hchr61b0@mahatransco.in या ईमेल व्दारे सादर करण्यात यावे.**

१. वरील निवड यादी क्र. २ (SELECT LIST) मध्ये समाविष्ट उमेदवारांनीच दिनांक ०८.०८.२०२३ ते दिनांक १७.०८.२०२३ या कालावधीत खाली नमूद केलेल्या पत्यावर सकाळी ११.०० ते दुपारी ५.०० या वेळेत (शनिवार, रविवार व सार्वजनिक सुट्टया वगळून) मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी हजर रहावे. दि. १७.०८.२०२३ नंतर मूळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे पडताळणीसाठी येणाऱ्या उमेदवारांची निवड रद्द करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

कागदपत्रे / प्रमाणपत्रे

१. शाळा सोडल्याचा दाखला (जन्मतारखेसाठी)

२.ITI Marklist (2/4 Semister) / SSC Mark List & Certificate

३. राखीव गटातून उमेदवाराने अर्ज केला असेल तर जात प्रमाणपत्र व असल्यास जातवैधता प्रमाणपत्र

४. आर्थिक दुर्बल घटक उमेदवार मोडत असेल तर चालु अद्ययावत प्रमाणपत्र

५. आधार कार्ड (आधार कार्ड वरील पत्ता पुढील कामकाजासाठी ग्राहय धरला जाईल)

६. Bank Passbook

वरील सर्व मुळ कागदपत्रे तसेच सर्व कागदपत्रांचा वरील क्रमाने साक्षांकीत प्रतींचा १ संच

पत्ता :-
कार्यकारी अभियंता
अउदा.संवसु.विभाग पिंपरी-चिंचवड,पुणे
२२० के. व्ही. उपकेंद्र चिंचवड जवळ, बिजलीनगर
चिंचवड पुणे - ४११ ०३३
**e-mail ID:- dymgrhr61b0@mahatransco.in**

(दीपक दे. मदने)
कार्यकारी अभियंता
अउदा.संवसु.विभाग
पिंपरी-चिंचवड,पुणे